# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


प्रेसनोट क्रमांक :- ११९-२२ दिनांक :- २७/०४/२०२२

## प्रतिबंधीत तंबाखु मिश्रीत हुक्का उपलब्ध करुन देणाऱ्या व हुक्का ओढणाऱ्या ईसमांवर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत असलेले अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना दिनांक २६/०४/२०२२ रोजी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, मिरारोड (पुर्व), शितल नगर येथील रश्मी पार्क बिल्डींग मधील कॅफे शिशा हर्बल लॉन्जचा चालक हा गिऱ्हाईकांना तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का उपलब्ध करुन देत असून लॉन्जमध्ये हुक्का पुरवित आहे, अशी गुप्त बातमी मिळाली होती.

सदर मिळालेल्या बातमीप्रमाणे कॅफे शिशा हर्बल लॉन्ज या ठिकाणी छापा कारवाई केली असता सदर ठिकाणी आस्थापनेचा चालक मुकमिनुल अलीमुद्दीन हुसेन याने त्याचे सोबत आस्थापनेमध्ये वेटर म्हणुन काम करणारे १) रिजवान इरफान शेख २) अब्बास नुर हुसेन खान ३) राकेश मुन्नाभाई पटेल यांचेसोबत स्वतःचे कॅफे शिशा हर्बल लॉन्ज मध्ये ग्राहकांना तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का उपलब्ध करुन देउन सदर लॉन्जमध्ये ग्राहकांना हुक्का पुरविला असुन तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का पिणारे एकुण ९ ग्राहकांना ताब्यात घेवुन कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई दरम्यान कॅफे शिशा हर्बल लॉन्ज या आस्थापनेमधुन २० हुक्याचे काचेचे पॉट, ३२ नग हुक्का पिण्यासाठी वापरण्यात येणारे रबरी पाईप, एक स्टिलचा झारा, एकूण ०५ नग चिनीमातीच्या चिलीम, अल फख्र, रॉयल स्मोकीन अफजल, इंपेरियल स्मोकस् कंपनीचे तंबाखुजन्य एकुण ५१००/-रु. किंमतीचे पाकीटे व ४६००/-रु. रोख रक्कम असा मुदेमाल जप्त करण्यात आला असुन सदर ईसमांविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ।। १८२/२०२२ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने यांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यावर निर्बंध अधिनियम २००३ चे कलम ४ (क), २१ (क) प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक देवीदास हंडोरे, पो.हवा.०२०१७/पवन पाटील, प्रदीप टक्के, अजय सपकाळ, सुभाष आव्हाड, विष्णु घरबुडे, अजय यादव यांनी केली आहे.